# India as an Emerging World Power

## Past, Present and Future Contexts
## (Multidisciplinary Approach – VOL- 1)



Chief-Editor
Dr. Arvind Prasad Dwivedi

Editor
Dr. Chandar H. Rohra
Kritika
Mohini Singh Vishen
Dr. Akshay G. Mangavade

# India as an Emerging World Power: Past, Present and Future Contexts

## (Multidisciplinary Approach - VOL- 1)


**Chief-Editor**
**Dr. Arvind Prasad Dwivedi**

**Editor**

**Dr. Chandar H. Rohra**
**Kritika**
**Mohini Singh Vishen**
**Dr. Akshay G. Mangavade**



India as an Emerging World Power:
Past, Present and Future Contexts
(Multidisciplinary Approach - VOL-1)



**Nitya Publications**

Fist Edition 2023

All rights reserved

The characters and events portrayed in this book are fictitious. Any similarity to real persons, living or dead is coincidental and not intended by the author.

No part of this book may be reproduced, or stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording, or otherwise, without express written permission of the publisher.

Copyright © Dr. Vishnu Balkrushna Wahatule

ISBN: 978-93-5857-674-0

Price: Rs. 300.00

Published & Printed by:

Nitya Publications, Bhopal MP India

Web: www.nityapublications.com

Email: info@nityapublications.com

*Mob. 9009840*

**Disclaimer**

If any future problems (Like- Plagirism, Copyright, Duplicate information, Data manipulation etc.) arise with a research paper, the research paper contributor will be solely responsible for those problems. Chief Editor (Author) Editors, Publisher and other research paper contributor will not be responsible in any way.

# Contents


| Sr. No | Name of the Paper | Name of the Professor | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Electric vehicles, the road ahead - A study of economic potentiality in purview of the legal environment relating manufacturing of electric vehicles in India. | Dr. Chandar H Rohra | 01 |
| 2 | Start-ups for Indian Railways: A new initiative | Mr. P Bala Muralidhar | 07 |
| 3 | "6G Network Management for UAVs Swarms" | Dr Rashmi Soni, Dr Piyush Kumar Soni | 15 |
| 4 | Through the Disciplinary Kaleidoscope: India's Emergence as a World Power | Subharun Pal | 27 |
| 5 | Role Of Teacher In Inclusive Education | Mr. Sharabayya Swami | 32 |
| 6 | 'Partition's Legacy: Train to Pakistan's Unforgettable Divide and Journey' | Mr. Kunal Shivaji Katkade | 38 |
| 7 | A Study on the Problems and Prospects of Eco-Tourism in Poba Reserve Forest of Dhemaji District, Assam, India | Prantik Bordoloi [1*], Nilutpal Dutta [2] | 51 |
| 8 | Media and Entertainment law: Emerging trends and issues | Mrs. Payal Kothari | 58 |
| 9 | India As A Super Power 75 Years After Independence | Anthony Savio Herminio da Piedade Fernandes | 62 |
| 10 | Application of Differential Equations | Dev Kumar Singh [(1)], Sushil Kumar [(2] | 66 |
| 11 | Fault Tolerant Drives For Aerospace Applications | Dharmendra kumar sharma[(1)], Manoj Kumar [(2)], Kriti Mishra [(3)], Bhaskar Gupta[(4)] | 71 |
| 12 | Productivity Linked Assembly And Package In Paper Industry | Author:-Vishnu Kumar Singh[1] Dharmendra Kumar[2] Dr. Bhaskar Gupta[3] | 82 |
| 13 | A Study On Inventory Control Management System In Company | Dr. Manjula A. Soudatti | 88 |
| 14 | A Study On Novel Emerging And Re-Emerging Viral Zoonoses And Factors Influencing Viral Epidemiology In India | Anu Swedha Ananthan* and Kiruthika Saravanan | 91 |
| 15 | भारतीय लाकतंत्र में राजनीतिक दल–आलोचनात्मक अध्ययन | डॉ. आशुतोष मीणा | 98 |
| 16 | भारत में राजनीतिक दलों का स्वरूप एवं उनकी भूमिका | डॉ. अजीत | 107 |
| 17 | संग्रामपूर तालुक्यातील आदिवासी जमातीचे जीवनमान | प्रा. संतो ा रामभाऊ ढगे | 113 |
| 18 | 'मळयाची माती' या काव्यसंग्रहातील स्त्री जाणिवांचा वेध | डॉ.आर.डी.शिंदे | 119 |

# 'मळ्याची माती' या काव्यसंग्रहातील स्त्री जाणिवांचा वेध

**डॉ.आर.डी.शिंदे**

मराठी विभाग प्रमुख

कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी

ता.इगतपुरी जि.नाशिक

ईमेल– तर्कीपदकम2012 / हउंपसण्बवउ

**प्रस्तावना :**

*प्राचीन काळापासून मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याच्या खूणा दिसून येतात. ग्रामीण समाज, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण लोकपरंपरा आणि ग्रामीण भा तेतील ब्दांचे उपयोजन यासह ग्रामीण लोकजीवनाचे अनेक संदर्भ ग्रामीण साहित्यात दिसून येतात. ग्रामीण साहित्याला व्यापक दिशा आहे. ग्रामीण मराठी साहित्याला मोठी परंपरा आहे. काळखंडानुसार अनेक मराठी लेखकांनी साहित्य निर्मितीच्या काळात तत्कालीन समाजमन आणि मानवीमनाचा वेध साहित्याच्या माध्यमातून घेतलेला आहे. त्यामुळे काळानुरूप ग्रामीण साहित्याने बदलत्या समाजाचे चित्रण केले आहे. काळ जसा बदलत गेला, त्याप्रमाणे ग्रामीण माणूस, समाज आणि त्यांची विचारधरा बदलत गेली. बदलत्या काळानुसार ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जनजीवनाचे प्रतिबिंब आपल्या साहित्यात निर्माण करीत ग्रामीण साहित्याचा आयाम मोठा निर्माण केला. काळाच्या ओघात ग्रामीण साहित्याचा वेगाने विकास होत गेला. मराठी ग्रामीण साहित्याच्या विस्तारीकरणासाठी अनेक लेखकांचे योगदान महत्वाचे ठरले. या सर्वांमध्ये ग्रामीण लेखक आनंद यादव यांचे योगदान महत्वाचे मानले जाते. त्यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण समाज,संस्कृती,भौगोलिक परीसर आणि मानवी मनाच्या बदलत्या मनोवृत्तीचा वेध घेतला आहे. आनंद यादव यांच्या साहित्य लेखनाबद्दल अनुराधा पोतदार लिहितात.'''मळ्याची माती' ही माती यादवांच्या साहित्यात बाहेरून,उपरेपणाने आलेली नाही. कारण निखळ सच्चेपणाने व ताकदीने ती तशी बाहेरून येऊ शकत नाही. या मातीतच त्यांची मुळेरूजली आहेत. या मातीतच त्यांचे पाय रोवले आहेत..'' 1*

*'मळ्याची माती' या काव्यसंग्रहात ग्रामीण परीसराबरोबर शेती,शेतकरी त्यांच्या समस्या यासह विशेषता स्त्री जाणीवा आणि त्यांच्या भावना काव्यातून व्यक्त होतात. 'मळ्याची माती' या काव्यसंग्रहातून त्यांनी स्त्री भावनेचा विचार मांडलेला आहे.*

**सारांश** :

कवी आनंद यादव यांच्या 'मळयाची माती' या कवितासंग्रहातून ग्रामीण लोकजीवन, लोकभावना यासह विशे I स्त्री जीवनाचा आणि त्यांच्या भावनेचा विचार चित्रित केलेला आहे. स्त्री केवळ चूल आणि मूल या भोवती न फिरता शेती आणि कुंटुव यांच्या विकासात तीचे महत्वाचे योगदान आहे. महिलांना सामाजिक, धार्मिक, कौटुबिक आणि आर्थिक परिरिथतीत अनेक संकटांचा सामना करावा लागतो. स्त्रीच्या जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या, त्यांची होणारी कुंचवना यासह प्रापंचिक जीवनात निर्गाण होणाऱ्या विविध समस्येतून गार्ग ोधणारी महिला आनंद यादव यांच्या काव्यातून दिरून येते. कुंटुबाचा आणि समाजाचा विकास करण्यात महत्वाचे योगदान असणाऱ्या महिलांचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.

**अभ्यासाची उदिष्टे**

1) ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या कष्टमय जीवनाचा शोध घेणे.

2) ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या समस्यांचे स्वरुप पहाणे.

3) ग्रामीण भागातील स्त्रीयांचा कौंटुबिक जिव्हाळा शोध घेणे.

**संशोधनाची पद्धत :**

सदर ोध निबंधासाठी विश्ले णात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**गृहीते**

1 शेती व्यवसाय योगदान देणाऱ्या महिलांचा शोध घेणे.

2 कुंटुबाचा आधार असणाऱ्या महिलांचा शोध घेणे.

3 समाजमूल्ये व्यवस्थांचा आदर करणाऱ्या महिलांचा शोध घेणे.

**'मळ्याची माती'या काव्यसंग्रहातील स्त्री जाणिवा**

कवी आनंद यादव यांचा 'मळ्याची माती' या काव्यसंग्रहातील कवितांचा अभ्यास केला असता, यामध्ये मानवी मनातील प्रेमभावना, निसर्ग कविता, मानवी चिंतनपर कविता, दारिद्रयवि ायक कविता, इत्यादी कवितांचा समावेश केलेला आहे. अशा प्रकारच्या कवितांच्या माध्यमातून कवी आनंद यादव यांनी स्त्री जीवनाचा आणि स्त्री भावनेचा विचार मांडलेला आहे. तो प्रामुख्याने पुढील अभ्यास घटकाच्या अनु ंगाने आपण विचार करु

**1) ेती व्यवसाय विकासात योगदान :**

सर्व समाजाला जगविणारा, त्यांना आधार देणारा, आपल्या क टाच्या माध्यमातून अन्नरूपी सोनं पिकविणारा ेतकरी सातत्याने कष्ट करीत शेतात विविध पीके घेत असतो. असे असले तरीही, त्याला त्याची पत्नी त्याच्या कष्टात तेवढेच योगदान देते. ग्रामीण भागातील ज्या कुंटुबांचा विकास झाला, त्या कुंटुबाच्या आणि त्यांच्या ेती क्षेत्राच्या विकासासाठी तीचे क ट आणि आर्थिक नियोजनातील तिचे योगदान महत्वाचे ठरते. त्यामुळे तीचे कौंटुबिक विकासातील कार्य दुर्लक्षीत करून चालणार नाही. याचे वेगवेगळे संदर्भ आनंद यादव यांनी आपल्या काव्याच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. कुंटुबाच्या आर्थिक नियोजनात आणि पीक लावणीच्या नियोजन संदर्भात स्त्रीचे योगदान लिहिताना, कवी आनंद यादव 'पुढंला' या कवितेत लिहितात. या कवितेतील नायीका आपल्या नवऱ्यास सांगते.

**" खेडव्याच्या रानात नगं कडवाल**
**दोन्हीबी खांडांत हरभरा पेरा**
**बैलांस्नी कापूर भुगोरा**
**उसाला घाला मायदांळ सल्पीठ**
**येईल बिगीद्यान घाणा कराया"** [2]

पुढील व ार्त मुलाचे लग्न आहे. त्यासाठी लागणारा खर्च मोठा आहे. हा खर्च भागविण्यासाठी ेतीतील पीकांचे योग्य नियोजन करण्यासाठी पत्नी पुढाकार घेते. यावरून हे दिसून येते की महिला केवळ चुल आणि मुल न संभाळता आपल्या कुंटुबांसाठी आधार बनत आहे. घराच्या व शेतीच्या विकासासाठीचे योगदान उपयुक्त ठरते. शिक्षण कमी असले तरीही त्यांच्याकडे जीवनाची दृष्टी होती. विचार करण्याची दिशा होती.त्यामुळे अशा महिलांचे योगदान महत्वपूर्ण मानले पाहिजे.

ेतकरी ेतात राबून आपला परिवार सुखाचा ठेवण्यासाठी ज्याप्रमांणे प्रयत्न करतो, त्याचप्रमाणे स्त्री देखील प्रयत्न करीत असते. किंबहुना सातत्याने वाढणारी महागाई, वाढता खर्च आणि कमी प्रमाणात येणारे सर्वच बाजूचे उत्पन्न यांचा विचार करता, आपल्या मुलाबाळाचे शिक्षण अपूर्ण राहते. परीवाराच्या आणि मुलांच्या विकासासाठी शिक्षण ही प्रथम गरज असते हे ती ओळून असते. परंतु कुंटुबातील सामाजिक समस्यासह घरात

आर्थिक विषमता असल्यामुळे मुलांना आपण शिक्षण देऊ शकत नाही, यांची खंत सातत्याने वाटत असते. मुलांच्या भवि याचा गुंता आणि शिक्षणाभावी होणारे नुकसान सतत तिला सतावत असते. कुटुंबाच आर्थिक भार पेलविण्यासाठी नाईलाजाने मुलांना ाळा सोडून ोतात कामाला जुंपावले लागते. याची खंत व्यक्त करण्याबरोबरच नेमकी अडचण काय आहे.? याचे चिंतन ती 'लई वाटतयं' या कवितेत करताना म्हणते,

**"आम्हांस्नीबी लय वाटतंय**

**पोरास्नी शिकवावं असं**

**आम्हाला काय इनाम हाईतं?**

**लंगुटीएवढीबी नाही पटटी**

**न्हेतावं दीस कसंतरी ढकलत**

**आहो आमच्या नशिबी ोणाचीच पाटी "** [3]

ोतीक्षेत्र कमी, उत्पन्न कमी अशा परिस्थितीत मुलांना विकासासाठी शिक्षण मिळणे गरजेचे असले तरीही, आर्थिक समस्यांमुळे त्यामुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते.भारत स्वतंत्र्य झाला. भारताच्या विविध भागातील लोकांना विकासाची आशा मिळाली. परंतु समाजाचा पाहिजे तेवढा विकास झाला नाही. आजही माणूस वाढत्या महागाईत पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने राबत असतो. शेतमजूर आणि अल्पभूधारक शेतकरी यांच्या जीवनाची आणि संघर्षाची व्यथा मोठी आहे. गावात ोती नाही. रोजंदारी मिळत नाही. अशा प्रसंगी पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी निर्माण होणारी समस्या कवीने काव्याच्या माध्यमातून मांडलेली आहे. पोटापाण्याची समस्या सोडविण्यासाठी आपल्या मुलांना कामाला जुंपवे लागते, याची खंत वरील कवितेतील महिला व्यक्त करते.

स्त्रीचा जन्म म्हणजे क ट आणि सातत्याने क ट करत राहणे, हेच चित्र काव्याच्या माध्यमातून दिसून येते. घराच्या विकासासाठी आणि ोतीची उन्नतीसाठी क ट करावे लागते. रोजच्या कष्टामुळे आपले आयु य हे क टमय बनले यांची खंत वाटण्याबरोबरच तीचे आयु यएक दगड बनले आहे. महिलांच्या कष्टमय जीवनाचे चित्रण करताना, कवी आनंद यादव 'भर दुपारी' या कवितेत लिहितात.

**" नशिबाला घाम घालत**

**जन्माचा दगूड करून**

**आई लावती त्येच्यावर याण"** [4]

एका मुलाने आपल्या आपल्या आईचे कष्टमय आणि वेदनामय जीवनचित्रण रेखाटताना संपूर्ण समाजातील स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे.

वाढत्या महागाईच्या काळात क ट करीत कुंटुब चालविणे आवघड होत आहे. क ट करून पैसा जमविण्याचा कितीही प्रयत्न केला तरीही कुंटुबासाठी लागणाऱ्या खचार्चा हिशोब प्रथम करावा लगतो. त्यासाठी इतर कोणत्याही प्रकारची हौस करता येत नाही. सातत्याने प्रपंच करीत असताना, स्वःतकडे लक्ष नसते. कष्ट हेच जीवन झालेले असते. साडीला अनेक ठिगळे जोडून दिवस काढणारी महिला सणासुदीला नवी साडी घेण्याची आपली हौस पूर्ण करु ाकत नाही, साडीऐवजी कमी खर्चाची नवी चोळी घेत आनंदाने सण साजरा करते.एकंदरीत कोणत्याही संकंटसमयी आपण कसे वागावे.? याचा विचार करण्याबरोबरच आनंद कशात आहे.? याचा ोध घेत, समजदूरदपणा दाखविणारी स्त्री दिसते. अशा सामज्यंस महिलांच्या जीवनाबद्दल कवी आनंद यादव **'गौरीचा सण'** या कवितेत लिहितात.

**"असा हाय दीडरूपया**

**ठेवलेला उंतरडीला**

**सोन्यासारखा सण आलाया**

**चोळी घेती दंडाला !" [5]**

कवी आनंद यादव यांनी आपल्या 'मळयाची माती' या कवितासंग्रहात निवडक कवितांच्या आधारे कुंदुबासाठी राबणारी, कुंदुबाचा विकास करणाऱ्यासाठी सातत्याने कष्ट करणारी, वाढती महागाई आणि त्यातून वाढणारा खर्च यामुळे आपला प्रपंच चालविणे शक्य होत नाही, यांची खंत व्यक्त करणारी महिला चित्रित केली आहे. आपण आपल्या मुलांचे आपण शिक्षण पूर्ण करू शकत नाही. याचे दुःख व्यक्त करते.

**2द्ध कुंदुबावर प्रेम करणारी महिला**

आपल्या कुंदुबाचा, शेतीचा आणि विविध संकटसमयी समर्थपणे उभा राहणारा आपला नवरा हाच आपल्या कुंदुबाचा आधार आहे. त्याने घरासाठी, शेतीसाठी केलेले क  ट तिला दिसत आहे. त्यामुळे आपल्यावर, आपल्या परिवारावर आणि  ोतीमातीवर प्रेम करणाऱ्या स्वःतच्या पतीवर तिचे नितांत प्रेम आहे. ती देखील मोठया विश्वासाने त्याच्याबरोबर कष्ट करीत असते. त्याचा विश्वास कधीही कमी पडू देत नाही. त्याच्या सोबतीने त्याच्यासाखीच  ोतात राबत असते.  ोतात राबणाऱ्या पतीला भाकरी वेळेवर गेली पाहिले, याची जाणीव तिला असते. उशीर झाला तर आपला पती उपाशी राहिल या काळजीने आपल्या सोबतीनीला ' गेल असतील भुक्यावुनी' या कवितेत म्हणते.,

**'चल बाई बिगी बिगी**

**गेल असतील भुक्यावुनी' [6]**

आपल्या पतीच्या क  टाबरोबरच त्याच्या भुकेची काळजी करणारी त्याची पत्नी आनंद यादवाच्या काव्यात दिसून येते. घरदाराचा सार भार नवऱ्यावर आहे. त्याचे कष्ट तिला सातत्याने जाणवत असते. त्याने गावात कितीही कष्ट केले तरी कुंदुबाचा खर्च भागत नाही. काही प्रसंगी गावात हाताला काम मिळत नाही. प्रसंगी अपुऱ्या रोजंदारीमुळे घरदाराचा खर्च भागात नाही. अशा वेळी गावात राहून उपाशी मरण्यापेक्षा  ाहरात राहून क  ट करीत संसाराला हातभार लावणे चांगले. शहरातील कष्टामुळे चार पैसे मिळतील. या विचाराने नवरा पोटासाठी बाहेर गावी जातो. दोघेहीऐकमेकांपासून दूर असले तरीही पती पत्नीचे प्रेम आणि जिव्हाळा कायम राहतो. कवी आनंद यादव 'यांच्या काव्याबद्दल, डॉ.रविंद्र ठाकूर लिहितात, "....नितांत कष्टानी भरलेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी यादवांची कविता आशद्रव्य आणि अभिव्यक्ती याबाबत कोणत्याही प्रकारे त्या जीवनाशी प्रतारणा करू शकत नाही...." [7] म्हणजेच कवीची कविता ही निर्मळ आणि कष्टमय जीवनशीएकरूप होत आहे. परमुलखात जाणाऱ्या आपल्या पतीबद्दलच्या भावना व्यक्त करताना, 'उभ्या उभ्या' या कवितेत ती म्हणते.

**" परमुलखात जातासा**

**पर हया**

**पायांवर पडलेल्या पाण्याला**

**इसरू नका**

**हया पदराची  ापथ" [8]**

कवितेतील महिला  ापथ घेऊन सांगते, की आपण परमुलखात जात असला तरी पुन्हा गावी या. मला आणि कुंदुबाला विसरू नका. कौंटुविकऐकोपा जपण्याचा संदेश कवी आनंद यादव यांच्या काव्यातून दिसतो. घरापासून आपल्या मुलाबाळापारून रोजीरोटीसाठी दूर जाऊ नये असे आनंद यादव यांच्यासह अनेक लेखकांना वाटते.परंतु ग्रामीण भागातील लोकांच्या विविध समरया आहेत. ग्रामीण भागातील समरयाकडे मराठी लेखक का वळाले? या संदर्भाते ते ' मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा' या ग्रंथात आनंद यादव लिहितात," तेथे आपले खरे भारतीय जीवन आहे. तेथील लोकांचा उद्धार झाला पाहिजे.त्यांच्या जीवनातील विषमता, दारिद्रय, अज्ञान, परंपराप्रियता नाहीशी झाली पाहिजे. समानतेच्या भूमिकेवरून वागविले पाहिजे.तेथे रामाजरुधारणा व समाजोद्धार करायला

भरपूर वाव आहे.'' ⁹ भारताचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनाचा विकास होणे गरजेचे आहे.असे येथे नमूद करावेसे वाटते.

**निष्कर्ष :**

कवी आनंद यादव यांच्या 'मळयाची माती' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून स्त्री जीवन, त्यांचे भावविश्व यासह भावभावना, कुंटुबाच्या विकासासाठी त्यांना करावी लागणारी धडपड काव्यातून व्यक्त होत आहे. कवी आनंद यादव यांच्या 'मळयाची माती' या काव्यसंग्रहातील निवडक कविताचा अभ्यास केला असता स्त्री जीवनाचे चित्रण व्यक्त होते. निवडक काव्याचा विचार केला असता ते पुढील प्रमाणे जाणवतात.

1) महिलांनी कुंटुबाचा विकास हाच घटक महत्वाचा मानलेला आहे.

2) शेतीविकासात विशेष लक्ष देत आर्थिक विकासासाठी योगदान देतात.

3) कष्ट करणाऱ्या आपल्या पतीचा आदर आणि विशेष प्रेम व्यक्त करतात.

**शिफारस**

कवी आनंद यादव यांच्या 'मळयाची माती' या कवितासंग्रहातील निवडक कवितांचा अभ्यास केला असता, ग्रामीण भागातील कष्टकरणाऱ्या महिलांच्या जीवनात विविध अडचणी निर्माण होतात. अशा अडचणी दूर करीत त्यांच्या कष्टाला न्याय देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रामुख्याने पुढील बाबी विचारात घेणे अपेक्षित आहेत.

1) ग्रामीण भागातील महिलांच्या रोजंदारीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

2) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीबरोबर उपजिविकेसाठी इतर रोजंदारी मिळावी.

3) ग्रामीण भागातील महिलांच्या उन्नतीसाठी विशेष आर्थिक तरतूद करावी.

4) शिक्षणाचा प्रसार करण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडविणे आवश्यक आहे.

**समारोप**

कवी आनंद यादव यांच्या 'मळयाची माती' या काव्यसंग्रहातील निवडक कवितांचा अभ्यास केला असता, स्त्री जीवन, त्यांचे कौटुंबिक, आर्थिक जीवन यासह शेतीविकासातील त्यांचे योगदान महत्वाचे ठरत आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी समाज,कुंटुब आणि शासकीय पातळीवर सहकार्य मिळणे गरजेचे आहे.या सर्वांच्या सहकार्याने स्त्री जीवनाचा विकास होईल.

**संदर्भ**


1) पोतदार अनुराधा प्रस्तावना *यादव आनंद 'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै *2010*, पृष्ठ क 8

2) यादव आनंद *'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै 2010,पृष्ठ क 8

3) यादव आनंद *'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै 2010,पृष्ठ क7

4) यादव आनंद *'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै 2010,पृष्ठ क 68

5) यादव आनंद *'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै 2010,पृष्ठ 5

6) यादव आनंद *'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै 2010,पृष्ठ क 32

7) ठाकूर रविंद्र, *'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास.'* संपादक चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स् कोल्हापूर व्दितीय आवृत्ती मार्च 2012 पृष्ठ क 152 )

8) यादव आनंद *'मळयाची माती',* 'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, पुनर्मुद्रण जूलै 2010,पृष्ठ क 52)

9) यादव आनंद, *'मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा'* मेहता पब्लिकेश हाउस पुणे पहिली आवृत्ती 1979 पृष्ठ क. 63)